ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 8 | No - 3 | Issue - 24 | August 2020 | ISSN- 2347-9639

37Years

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

IIJIF
Impact Factor
2.283

## कोवीड-१९



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक - प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार । डॉ. मनोहर पाटील

अथर्व

64

Scanned with OKEN Scanner

- **The Lockdown Resulted in Detoxification of Earth /Mumbai Air** .................. 150
  - Ujwala P. Patil, R. S. Lokhande
- **Impact of Covid 19 Pandemic on India** .................. 155
  - Dr. Ravindra Bhanage
- **COVID-19 Outbreak and The Changing Relations Between India and Her Neighbours** .................. 159
  - Dr. Shaif Yahya Ali Alqudaim i
- **भारत में लॉकडाउन की चुनौतिया** .................. १६३
  – डॉ. कृष्णा सोलंकी
- **भारतातील टाळेबंदीच्या काळातील आव्हाने** .................. १६६
  – जयश्री पंडीतराव पोटपल्लेवार
- **कोवीड–१९ : स्थलांतरित मजुरांचे हक्क व न्यायालयीन सक्रीयता** .................. १७२
  – प्रा. वैशाली प्रशांत सुपेकर
- **कोरोनोत्तर कालखंडातील मराठी विषयाचे अध्ययन आणि अध्यापन** .................. १७५
  – योगिता कालिदास चोडणकर
- **कोविड १९ का सामाजिक जीवन पर प्रभाव** .................. १८१
  – डॉ. एम. एस. तम्बोली
- **कोवीड २०१९ कोरोना जागतिक महामारीचा शैक्षणिक क्षेत्रावरील परिणाम** .................. १८३
  – सौ. चित्ररेखा रविंद्रनाथ जाधव
- **कोरोना संकट आणि भारतीय अर्थव्यवस्था** .................. १९२
  – डॉ. प्रफुल्ल ए. राऊत
- **लॉकडाऊन आणि आर्थिक संकट** .................. १९६
  – शेवतेकर सचिन सुधाकर
- **कोविड–१९ व व्यावसायीक शिक्षण** .................. १९८
  – डॉ. कांतीलाल डी. सोनवणे
- **भारतीय कृषी क्षेत्रावर कोविड–१९ चा प्रकोप – एक अभ्यास** .................. २०१
  – प्रा. जगदीश अमृतराव कुवर
- **कोविड–१९ आणि भारतीय राजकीय प्रक्रिया : एक निरीक्षण** .................. २०५
  – प्रा. डॉ. बळीराम दत्तात्रय कटारे
- **कोव्हिड १९ : भारतीय समाज जीवनावर सामाजिक व आर्थिक परिणाम** .................. २०९
  – डॉ.प्रशांत विघे




65

Scanned with OKEN Scanner

ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR



# कोवीड–१९ : स्थलांतरित मजुरांचे हक्क व न्यायालयीन सक्रीयता

प्रा. वैशाली प्रशांत सुपेकर
राज्यशास्त्र विभाग,
अण्णासाहेब औटे कॉलेज, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे

## प्रस्तावना

जगामध्ये चीनमधील वुहान येथे 'कोरोना' या विषाणूजन्य आजाराची सुरुवात झाली आणि हळूहळू सर्वत्र पसरत जाऊन भारतातही सर्वत्र तो पसरू लागला. त्यामुळे २४ मार्च २०२० रोजी संपूर्ण देशभरात लॉकडाऊन जाहीर करण्यात आले. फार वर्षांपूर्वी भारतात प्लेग, मलेरिया, कॉलरा असे संसर्गजन्य आजार कोलकाता, मुंबई, चेन्नई आणि इतर शहरांतही पसरले होते. त्यावेळी भारतात फार मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले दिसून येते. १९४७ मध्ये भारत–पाकिस्तान फाळणी झाली तेव्हा स्थलांतर झाले. त्यानंतर कोवीड–१९ मुळे सर्वात मोठे स्थलांतर झाले. (Davis 1951; Banthia and Dyason, 1999) लॉकडाऊनमुळे अनेक मजूर–कामगार आपापल्या राज्यांत जाण्यासाठी प्रयत्न करू लागले. हे स्थलांतर होत असताना, त्यामुळे उद्योगधंदे, बांधकाम किंवा इतर क्षेत्रावर काय वाईट परिणाम झाले किंवा होतील याविषयी बरेच विचारमंथन झाले; परंतु या शोधनिबंधामध्ये या स्थलांतरितांच्या प्रश्नावर शासनाने घेतलेली भूमिका आणि न्यायालयीन सक्रियता याविषयी संशोधन करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

### उद्दिष्टे

१) शासनाच्या स्थलांतरितांविषयीच्या धोरणाचा अभ्यास करणे.

२) न्यायालयाने या विषयासंबंधी सक्रीयता दाखविलेली आहे की नाही याचा अभ्यास करणे.

भारताच्या अर्थव्यवस्थेत स्थलांतरित मजूर हा मजबूत कणा मानला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार १९४ दशलक्ष कामगार संघटित व असंघटित क्षेत्रात काम करत होते. आता त्यांची संख्या निश्चितच वाढली आहे, यात शंका नाही. दिल्ली, गोवा, हरियाणा, पंजाब, महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये त्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. (Policy Brics : The Covid-19, Migration and Livelihood in India : Challenges and Strategies – आं. जनसंख्या विज्ञान संस्थान देवनार, मुंबई) शहरीकरण वाढत असताना आर्थिक कारणांसाठी होणाऱ्या स्थलांतरांचे प्रमाणही वाढत गेलेले दिसून येते. आपल्या देशात विकास आणि स्थलांतराचे प्रश्न एकमेकांशी थेट संबंधित असल्याचे दिसते. मात्र स्थलांतराचा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिक व सांस्कृतिक आहे. जनगणना व आणि राष्ट्रीय नमुना पाहणीने स्थलांतराची सात कारणे मांडली आहेत. काम व रोजगारी संबंधित व्यापार, शिक्षण, विवाह, जन्माची वेळ व कुटुंबाबरोबर व इतरांबरोबर स्थलांतरण, दोनही गणना करणाऱ्यांच्या मते फक्त ३ टक्के भारतीयांनीच नोकरीसंबंधित कारणासाठी आपले नेहमीचे राहण्याचे ठिकाण सोडले आहे. पण जनगणना व राष्ट्रीय नमुना पाहणीतील विश्लेषणानुसार असे दिसून आले आहे की, १९९१ ते २००१ या १० वर्षांच्या काळात सर्व आंतरराष्ट्रीय स्थलांतरणापैकी ३२% लोकांनीच काम व नोकरीसाठी स्थलांतरण केले आहे. २००७–०८ च्या राष्ट्रीय नमुना पाहणीच्या अभ्यासानुसार १४.१ कोटी श्रमिक वा ३०.९% भारतातील श्रमिकांनी स्थलांतरण केले आहे. (स्थलांतरित श्रमशक्तीची फरफट थांबेना, प्रतिमा जोशी) इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन म्हणजेच खङज च्या अहवालानुसार, भारताच्या एवूण ५० कोटी श्रमशक्तीपैकी ९०% श्रमशक्ती ही असंघटित रोजंदारी रोजगाराशी जोडलेली आहे. म्हणजे ४५ कोटी लोक कोणतीही सामाजिक सुरक्षा नसलेले किंवा अगदी तुटपुंजी सुरक्षा असलेले कष्टकरी आहेत. रोजगार आणि किमान वेतनाची कोणतीही शाश्वती नाही.

आता या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगभरच उद्योग–व्यवसाय आणि रोजगार यांच्यावर संकट ओढवलेले असताना एकट्या भारतात या परिस्थितीमुळे किमान ४०% लोक अधिक गरिबीत ढकलले जातील असे आयएलओ सांगते. कोरोनाच्या वैश्विक संकटामुळे जागतिक अर्थव्यवस्था नाजूक अवस्थेत आहे. विविध देशांनी नाईलाजाने अंमलात आणलेल्या लॉकडाऊनमुळे अर्थव्यवहार ठप्प झालेले आहेत. रोजगार बंद झाल्याने



66

Scanned with OKEN Scanner

हजारो स्थलांतरितांना अन्न, निवारा तसेच रोगाची लागण होण्याची भीती निर्माण झाली. टेलीफोनिकच्या सर्व्हेनुसार उत्तर भारतातील ३००० स्थलांतरितांपैकी ४२% स्थलांतरितांना कोणत्याही प्रकारचे रेशनधान्य उपलब्ध होऊ शकले नाही. (जॉन साहस २०२०) ९४% मजुरांकडे ओळखपत्रे नव्हती.

आपल्या राज्यात किंवा गावी ज्यांना वाहतुकीच्या सुविधेअभावी जाता आले नाही. त्यामुळे मजुरांनी पायपीट केली. जे स्थलांतरित आपल्या गावी आले, त्यांच्याकडे कोरोना पसरविणारे म्हणून वागणूक मिळाली. एका मोठ्या राज्यात तर स्थलांतरित मजुरांना निर्जंतुक करण्यासाठी तेथील स्थानिक प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात अमानवीय फवारणी करण्यात आली. (India Today, 2020)

वरील मुद्यांचा विचार करताना स्थलांतरितांच्या हक्कांचे किती मोठ्या प्रमाणात हनन या लॉकडाऊनच्या काळात झाले याचा अभ्यास करता येतो. मग विषय हा ठरतो की, संकटकाळात राज्यघटना आणि तिची अंमलबजावणी करणारी यंत्रणा असा प्रश्न सोडवू शकतात का? कोवीड-१९ संदर्भात विविध याचिका उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या. मूलभूत हक्कांवर आधारित, मार्गदर्शक तत्त्वांच्या निकषांवर आणि संघराज्य वादाच्या आणि राज्याच्या जबाबदारीच्या दाव्यांवर तपासून बघण्याची आवश्यकता होती. परवडणारी आरोग्य सेवा, अन्न व इतर अत्यावश्यक गोष्टींचा पुरवठा होणे अत्यंत आवश्यक होते. याबाबतीत न्यायालयाची भूमिका फारशी सक्रिय दिसून आली नाही. न्यायव्यवस्था जर या परिस्थितीत काही करू शकत नसेल तर ती अपयशी ठरली असे म्हणावे लागेल. कोरोना महामारीचे असलेले जागतिक स्वरूप एक प्रकारचा थांबा आणि पहा दृष्टिकोन हे न्यायालयाच्या सुरुवातीच्या काळात हस्तक्षेप न करण्याचे कारण असू शकेलही; मात्र जेव्हा प्रचंड संख्येने अर्धपोटी मजूर, गर्भवती स्त्रिया व लहान मुले रस्त्यांवरून शेकडो किलोमीटर पायी चालत जात आहेत हे जेव्हा स्पष्ट झाले, त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने याबाबत सरकारला निर्देश देणे आवश्यक होते. मात्र तसे झाले नाही. (कोवीड-१९ आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय, मिहीर देसाई, २० जून २०२०)

गरिबांना परवडेल अशा दरामध्ये आरोग्य सेवा, मोफत रेशन, मजुरांचा मोफत प्रवास हे दायित्व राज्याचे असते. कल्याणकारी राज्याचे सर्वात मूलभूत तत्त्व हेच सांगते. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मध्ये विहीत केले आहे की, कोणत्याही परिस्थितीत आपत्तीच्या काळात गरिबांची काळजी घेणे बंधनकारक आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ३०० हून अधिक निकालांमध्ये भारत हे कल्याणकारी राज्य असल्याचा पुनरुच्चार केला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, पैरीवाला कायदा, ग्रामीण रोजगार हमी कायदा, असंघटित क्षेत्रातील कामगार सामाजिक सुरक्षा कायदा असे जे विविध कायदे केलेले आहेत ते मार्गदर्शक तत्त्वांचे पालनच आहे. असे असताना सार्वजनिक आपत्तीच्या परिस्थितीत काही घटकांच्या सुरक्षिततेचा विचार झाला नाही अशा परिस्थितीत राज्यघटना खूप महत्त्वाची असते. एखाद्या संकटकाळात राज्यघटना आणि तिची अंमलबजावणी करणारी यंत्रणा यांच्या खऱ्या कसोटीचा काळ असतो, यबाबतीत सर्वोच्च न्यायालयाला अपयश आले असे म्हणावे लागते. शासनाने काय केले पाहिजे हे सांगण्याचा अधिकार न्यायालयाला नक्कीच आहे. (कोवीड-१९ आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय, मिहीर देसाई, २० जून २०२०)

कायदेमंडळ आणि सरकारच्या निर्णयावर देखरेख ठेवले हा संवैधानिक न्यायालयाचा मूळ हेतू आहे. मोठ्या प्रमाणावर उपासमारीचे संकट, परप्रांतीय मजुरांची परवड या मुद्यांवर न्यायालयामध्ये ज्या जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या, त्याबाबतीत सरकारच्या वतीने जे दावे दाखल करण्यात आले होते, अशा दाव्यांची पडताळणी करण्यासाठी न्यायालयाने अचानक त्या ठिकाणी स्वतंत्र समित्या किंवा निरीक्षकाची नेमणूक करायला हवी होती, स्वतंत्रपणे तथ्य शोधण्याचा प्रयत्न न्यायालयाकडून झालेला दिसत नाही. चुकीच्या माहितीच्या प्रसरणामुळे स्थलांतरित मजूर रस्त्याने प्रवास करीत आहेत हा ३० मार्च २०२० रोजीचा सरकारचा दावा न्यायालयाने जेव्हा स्वीकारला, त्याच वेळी वृत्तवाहिन्या स्थलांतरित मजूर पायी प्रवास करतात हे दाखवत होते. तरीही न्यायालयाने यावर आम्ही काहीही करू शकत नाही असे प्रत्युत्तर देऊन याचिका पैटाळून लावली. रेल्वेने प्रवास करणाऱ्या स्थलांतरित मजुरांकडून कोणतेही भाडे न आकारण्याचे निर्देश, संवैधानिक न्यायालयाने देणे आवश्यक होते. अनेक प्रकरणांमध्ये सरकारला उत्तरदायी बनवण्यासाठी परमादेश (मँडॅमस) हा अधिकार वापरायला हवा होता.



67 ~~66~~ 68

Scanned with OKEN Scanner

मार्च २०२० पासून अनेक व्यक्ती आणि संघटनांनी कोवीड-१९ च्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली आहे की ज्यामध्ये उत्तम वैद्यकीय सुविधा किंवा इतर तज्ज्ञांची आवश्यकता स्पष्ट केली होती. मात्र या बाबी सरकारशी संबंधित आहे, न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही असा दृष्टिकोन न्यायालयाकडून ठेवला गेला. याशिवाय जनहित याचिकेमध्ये अशी मागणी करण्यात आली होती की, स्थलांतरित मजुरांच्या निवाऱ्याची सोय करण्यासाठी सरकारने हॉटेल्स, गेस्ट हाऊसेस, रिसॉर्ट अधिग्रहण करण्याचे आदेश द्यावेत. यावर केंद्र सरकारने आम्ही हे करत आहोत असे सांगितले आणि ही मागणी निकाली काढण्यात आली. १८ एप्रिल २०२० रोजी जगदीप छोकर यांनी स्थलांतरित मजुरांना त्यांच्या मूळ राज्यात परत जाऊ द्यावे आणि त्यासाठी सरकारने व्यवस्था करावी अशी याचिका दाखल केली. २१ एप्रिल २०२० रोजी या याचिकेची सुनावणी होती. या दिवशी न्यायालयाने केंद्राला स्थलांतरित मजुरांच्या प्रवासासाठी काही प्रोटोकॉल असल्यास तो अधिकृतरित्या सादर करण्यास सांगितले. मात्र या याचिका केवळ वर्तमानपत्रातील बातम्यांवरून दाखल केलेल्या आहेत, असा मुद्दा न्यायालयाकडून उपस्थित करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने एकदा तरी केंद्र सरकारला असे विचारणे अपेक्षित होते की, लॉकडाऊन घोषित करण्याच्या आधीच त्यांनी स्थलांतरित मजुरांसाठी काहीही नियोजन का केले नाही? २४ मार्च रोजी जेव्हा विषाणूचा संसर्ग कमी प्रमाणावर होता तेव्हाच स्थलांतरित मजुरांना प्रवास करून देणे अधिक परिणामकारक होते आणि २९ एप्रिल रोजी जेव्हा विषाणूचा संसर्ग इतका वाढला तेव्हा त्यांनी प्रवासास का परवानगी दिली? (Migrant Worker crises : The Supreme Court has -balicated all Responsibility, May 19, 2020, Jagdeep S. Chhokar, The wire)

**निष्कर्ष**

भारतीय शासन व्यवस्थेत सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि इतर काही क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनिश्चितता किंवा अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे यांच्या संदर्भात जेव्हा काही प्रश्न निर्माण होतात, न्यायालयाने सक्रीयता दाखविणे आवश्यक असते. भारतातील न्यायालयाची सक्रीयता ही मूलभूत हक्कांच्या प्रश्नातून निर्माण झालेली आहे. २०व्या शतकाच्या उत्तरार्धापासून न्यायालयीन सक्रीयता सुरू होऊन ती सामाजिक प्रश्नांच्या माध्यमातून तर कधी सामाजिक न्यायाच्या माध्यमातून वाढत गेली. अन्यायाचे निवारण, हिताची जपणूक न्यायालयाच्या माध्यमातून सरकारकडून व्हावी या हेतूने विविध जनहित याचिकांच्या मार्गाने लोक न्यायालयात जातात आणि या पद्धतीने न्यायालय त्या प्रश्नांची सोडवणूक करतात. एका दैनिकामध्ये एका वृद्ध महिलेने वाचकांच्या पत्राच्या माध्यमातून निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन मिळत नसल्यासंबंधीची आपली तक्रार मांडली. एका न्यायाधीशांनी ती तक्रार वाचली आणि तेच न्यायालयातील अपील समजून संबंधित विभागाला कारणे दाखवा नोटीस पाठविली. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे वृद्ध महिलेला निवृत्तीवेतन मिळणे सुरू झाले. हवाला कांड, विशाखा दिशानिर्देश, ग्राहक संरक्षण, पर्यावरण रक्षण, दुर्बल घटकांवरील अन्याय दूर करणे अशा अनेक क्षेत्रांत न्यायालयाने सक्रीयता दाखविली मात्र कोवीड-१९ च्या आरोग्याच्या आपत्तीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दाखविलेली दिसत नाही. बेरोजगारीमुळे, अन्नाचा पुरवठा न झाल्यामुळे, लॉकडाऊनच्या काळात उपजीविका सुनिश्चित करण्यासाठी नियोजनाच्या पूर्ण अभावामुळे जे शेकडो गरीब मजूर यांच्या हितासाठी ज्या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या, मात्र याबाबतीत न्यायालयाने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्थलांतरित मजुरांचा आणि त्यायोगे राज्यघटनेचा देखील अपेक्षाभंग केलेला आहे. भारत हा कल्याणकारी देश आहे आणि सुरक्षितता व सुरक्षा आणि अन्नपुरवठा या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. कोवीड-१९ ही केवळ राष्ट्रीय आपत्ती नसून ते एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील संकट आहे याची न्यायालयाला व्यवस्थित जाणीव असूनसुद्धा न्यायालय हस्तक्षेप करण्यास उत्सुक दिसून आले नाही.



68

Scanned with OKEN Scanner